# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

### एम.कॉम. प्रवेश माहितीपुस्तिका

- प्रस्तावना
- प्रवेश पात्रता
- अभ्यासक्रम रचना
- उपलब्ध विषय आणि अध्ययनाचे माध्यम
- प्रवेशशुल्क रचना
- ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया
- अभ्यास केंद्रावरील प्रवेश प्रक्रिया
- प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे
- पाठ्यक्रम
- स्वयं-अध्ययन साहित्य
- प्राध्यापकांचे मार्गदर्शन / व्याख्याने
- परीक्षा पद्धती

S.P.P.U. - SODL

**प्रस्तावना:**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या'**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**' या विभागाअंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स **(एम.कॉम).** या वाणिज्य शाखेतील २ वर्षांच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश उपलब्ध आहेत. सदर प्रवेश हे **दूरस्थ शिक्षण** पद्धतीने दिले जातात (बहिःस्थ विद्यार्थी म्हणून कोणतेही नवीन प्रवेश दिले जात नाहीत). **विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली** यांचे परिपत्रकानुसार पारंपारिक पद्धतीतील पदवी आणि 'दूरस्थ शिक्षण' पद्धतीतील पदवी या समकक्ष (Equivalent) असतात.

दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पारंपारिक शिक्षण पद्धतीप्रमाणे (नियमित विद्यार्थी) नाही. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त सूचनांनुसार दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष नोव्हेंबर २०२१ मध्ये सुरु होईल.

सदर प्रवेश प्रक्रिया ही अंशतः ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. सदर प्रवेशासाठी विद्यापीठामध्ये प्रत्यक्षात जाण्याची आवश्यकता नाही. मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेने दूरस्थ पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अनेक अभ्यासकेंद्रे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. त्यापैकी विद्यार्थ्याच्या सोयीनुसार एक अभ्यासकेंद्र हे विद्यार्थ्यांना निवडायचे आहे आणि तेथे आपली प्रवेशप्रक्रिया पूर्ण करायची आहे.

सदर अभ्यासकेंद्रे पुणे, अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्नित काही निवडक महाविद्यालयांमध्ये आहेत. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी अभ्यास केंद्र असलेल्या महाविद्यालयांची यादी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. त्या यादीमधून विद्यार्थ्यांनी त्यांच्या सोयीने कोणतेही एक अभ्यास केंद्र (महाविद्यालय) प्रवेश घेण्यासाठी निवडायचे आहे.

S.P.P.U.-SODL

**प्रवेश पात्रता**

एम.कॉम. या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी (Bachelors degree) आवश्यक आहे.

'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये प्रवेश घेण्यासाठी कोणतीही किमान / कमाल वयोमर्यादा नाही.

**अभ्यासक्रम रचना**

एम.कॉम. हा अभ्यासक्रम एकुण ६४ श्रेयांकांचा आहे.

सदर श्रेयांक पुढीलप्रमाणे विभागले आहेत:

| **वर्ष** | Core Courses | Special Subjects | **श्रेयांक** |
|---|---|---|---|
| **प्रथम** | CC-1 (८)<br>CC-2 (८) | Paper 1 (८)<br>Paper 2 (८) | ३२ |
| **द्वितीय** | CC-3 (८)<br>CC-4 (८) | Paper 3 (८)<br>Paper 4 (८) | ३२ |
| **श्रेयांक** | ३२ | ३२ | **६४** |

सदर ६४ श्रेयांक विद्यार्थ्यास किमान २ वर्षामध्ये तर कमाल ४ वर्षांमध्ये प्राप्त करणे आवश्यक आहे.

S.P.U. SODL

### अभ्यासक्रमासाठी उपलब्ध विषय आणि अध्ययनाचे माध्यम:

| Subject Group | M.Com. 1st Year Subjects | | | M.Com. 2nd Year Subjects | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Subject Code** | **Subject** | **Medium** | **Subject Code** | **Subject** | **Medium** |
| Compulsory Course | 101 | Management Accounting and Financial Analysis and Control | English | 201 | Business Finance And Capital Market and Financial Services | English / Marathi |
| Any <u>one</u> Course | 102 A | Strategic Management and Industrial Economics | English / Marathi | 202 A | Research Methodology for Business And Industrial Economic Environment | English / Marathi |
| | 102 B | Strategic Management and Business Statistics | English | 202 B | Research Methodology for Business And Operations Research | English / Marathi |
| **Any <u>One</u> Group from the Following:** | | | | | | |
| A | 103 | Advanced Accounting and Specialized Areas in Accounting | English | 203 | Advanced Auditing And Recent Advances in Accounting, Taxation & Auditing | English |
| | 104 | Income Tax and Business Tax Assessment & Planning | English | 204 | Specialized Auditing And Case Studies | English |
| B | 105 | Information system and E-Commerce Practices & E-Security & Cyber Laws | English / Marathi | 205 | Laws Relating to International Business And Recent Advances in Commercial Laws and Practices | English / Marathi |
| | 106 | Intellectual Property Laws and Laws Regulating to Copyrights & Design | English / Marathi | 206 | WTO – Norms & Practices And Case Studies | English / Marathi |
| C | 107 | Advanced Cost Accounting and Application of Cost Accounting | English | 207 | Cost Audit And Recent Advances in Cost Auditing and Cost System | English |
| | 108 | Costing Techniques and Responsibility Accounting and Cost Control & Cost System | English | 208 | Management Audit And Case Studies | English |

S.P.U.-SOL

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| D | 109 | Co-operative Movement in India and International Co-operative Movement | English / Marathi | | 209 | Co-operative Credit System And Recent Advances in Co-operative & Rural Development | English / Marathi |
| | 110 | Rural Development and Co-operative Management and Education | English / Marathi | | 210 | Co-operative Banking System And Case Studies | English / Marathi |
| E | 111 | Organized Trades and Markets and Modern Business Practices | English / Marathi | | 211 | Entrepreneurial Behavior And Recent Advances in Business Practices and Environment | English / Marathi |
| | 112 | Business Environment and Policy and Business Environment Analysis | English / Marathi | | 212 | Entrepreneurship And Case Studies | English / Marathi |
| F | 113 | Production and Operation Management and Business Ethics & Professional Values | English / Marathi | | 213 | Human Resource Management And Recent Advances in Business Administration | English / Marathi |
| | 114 | Financial Management and Elements of Knowledge Management | English | | 214 | Organizational Behaviour And Case Studies | English / Marathi |
| G | 115 | Legal Framework of Banking and Banking Law & Practices | English / Marathi | | 215 | Foreign Exchange And Recent Advances in Banking and Finance | English / Marathi |
| | 116 | Central Banking and Monetary Policy | English / Marathi | | 216 | International Finance And Case Studies | English / Marathi |
| H | 117 | Marketing Techniques and Customer Relationship Management & Retailing | English / Marathi | | 217 | International Marketing And Recent Advances in Marketing | English / Marathi |
| | 118 | Consumer Behaviour and Services Marketing | English / Marathi | | 218 | Marketing Research And Case Studies | English / Marathi |

प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी A / B / C / D / E / F / G / H यापैकी जो विषय गट निवडलेला आहे त्याच विषय गटातील विषय विद्यार्थी द्वितीय वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये निवडू शकतात. प्रथम वर्षास घेतलेला विषय गट द्वितीय वर्षास बदलता येत नाही.

S.P.P.U.-SODL

**प्रवेशशुल्क रचना:**

प्रथम वर्ष एम.कॉम. प्रवेशाकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पदवी प्राप्त विद्यार्थ्यांसाठी एकूण शुल्क रु. ६२००/- आहे तर इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी एकूण शुल्क रु. ६९००/- आहे. सदर शुल्कामध्ये प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, स्वयं-अध्ययन साहित्य शुल्क यांचादेखील समावेश असल्याने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियापूर्ण करणेसाठी प्रशाळेतर्फे sppuoa.digitaluniversity.ac हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.सदर संकेतस्थळावरील पुढील लिंक्सवर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

https://sppuoa.digitaluniversity.ac/esuvidha/instructionFinal/SavitribaiPhulePune.pdf

https://youtu.be/RAHj5oNbqIg

प्रवेशासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा अथवा गुणवत्ता यादी असणार नाही. "प्रथम येणाऱ्यास प्राधान्य" या तत्वावर उपलब्ध मर्यादित जागांसाठी प्रवेश दिले जातील.

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अपलोड करण्यासाठी विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो आणि विद्यार्थ्याची सही यांच्या स्कॅन केलेल्या प्रती आवश्यक आहेत.

**अभ्यास केंद्रावरील प्रवेश प्रक्रिया:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश अर्जाची PDF फाईल तसेच प्रवेश शुल्क पावती डाऊनलोड करून त्याची प्रिंट काढून घ्यावी. सदर प्रवेश अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह आपण निवडलेल्या अभ्यास केंद्रावर तातडीने जमा करणे आवश्यक आहे. प्रवेशासाठीचा अंतिम दिनांक दि. १५ डिसेंबर २०२१ असल्याने आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज दि. १५ डिसेंबर २०२१ पर्यंत अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे, अन्यथा विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज रद्द होईल.विद्यार्थ्यास अभ्यास केंद्रामध्ये जाणे शक्य नसल्यास तो प्रवेश अर्ज व कागदपत्रे जमा करणेसाठी आपला प्रतिनिधी पाठवू शकतो. परंतु, विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी आवश्यक असल्यामुळे टपालाने अथवा कुरियरने पाठवलेले प्रवेश अर्ज स्वीकारले जाऊ शकत नाहीत.

S.P.P.U. - SODL

विद्यापीठाद्वारे प्रवेश अर्जांची पडताळणी होऊन दिनांक ५ जानेवारी २०२२पर्यंत सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर PRN प्राप्त होतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर प्राध्यापकांची मार्गदर्शनपर सत्रे सुरु होतील.

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी पुढील कागदपत्रे सादर करावीत:

१) प्रवेश अर्ज (अभ्यास केंद्र प्रत)

२) प्रवेश अर्ज (विद्यार्थी प्रत)

३) आधार कार्ड (मूळ प्रत व झेरॉक्स)

४) पदवी परीक्षेचे गुणपत्रक (मूळ प्रत व झेरॉक्स)

५) पुढीलपैकी <u>एक</u> कागदपत्र (जे लागू असेल ते)

i) स्थानांतर प्रमाणपत्र(मूळ प्रत) (Transfer Certificate)

ii) स्थलांतर प्रमाणपत्र (मूळ प्रत) (Migration Certificate)

**i) स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये किंवा संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाने / विद्यापीठ विभागाने दिलेले 'स्थानांतर प्रमाणपत्र' (**<u>TransferCertificate</u>**)(मूळ प्रत)आवश्यक असेल.

**iii)स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यापीठाने दिलेले ‘स्थलांतर प्रमाणपत्र' (**<u>Migration Certificate</u>**)(मूळ प्रत)आवश्यक असेल.

प्रवेशासाठी खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट)ची आवश्यकता नाही.

**महत्वाची सूचना:**

S.P.P.U. - SODL

१) **विद्यार्थ्यास स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) जमा करणे आवश्यक असल्यास अशा विद्यार्थ्यांनी स्थानांतर प्रमाणपत्र (TC) जमा करण्याची आवश्यकता नाही.**

२) **अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्यासस्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)** मिळाले नसेल, तरीही विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज जमा करता येईल. अशा विद्यार्थ्यांनी **स्थलांतर प्रमाणपत्र** मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीची प्रत ही प्रवेश अर्जासोबत जोडावी. स्थलांतर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते मुक्त अध्ययन प्रशाळेकडे जमा केल्याशिवाय अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होणार नाही.

**पाठ्यक्रम:**

नियमित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ मान्यताप्राप्त जो पाठ्यक्रम (syllabus) लागू आहे तोच पाठ्यक्रम दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांना देखील लागू आहे. सदर पाठ्यक्रम (syllabus) प्रशाळेच्या unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सर्व अभ्यास केंद्रांवर समान पाठ्यक्रम असेल. अभ्यासकेंद्र हे स्वायत्त महाविद्यालयामध्ये असले तरीदेखील पाठ्यक्रम हा प्रशाळेचाच असेल (स्वायत्त महाविद्यालयाचा पाठ्यक्रम लागू असणार नाही). सर्व अभ्यासकेंद्रावर सर्व विषय उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यास कोणत्याही अभ्यासकेंद्रावर कोणताही विषय निवडता येईल.

**स्वयं-अध्ययन साहित्य:**

सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठमान्य अभ्यासक्रमानुसार तयार केलेले 'स्वयं-अध्ययन साहित्य' (सर्व विषयांची पुस्तके) उपलब्ध करून देण्यात येतात. प्रथमतः विद्यार्थ्यास PDF स्वरुपात पुस्तके उपलब्ध होतील. त्यानंतर छापील पुस्तके विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यास केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येतील.

**प्राध्यापकांचे मार्गदर्शन / व्याख्याने**

'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये 'पारंपारिक शिक्षण' पद्धतीप्रमाणे महाविद्यालयामध्ये नियमितपणे जाणे आवश्यक नाही. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रथमतः उद्बोधनपर 'ओळख वर्ग' आयोजित केला जातो.तसेच, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या पुस्तकांचा वापर करून स्वयं-अध्ययन कसे करावे याबाबत तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले

S.P.P.U.-SODL

जाते. यासाठी प्रत्येक विषयासाठी मार्गदर्शनपर **संमंत्रण सत्रे** (academic counselling sessions) ही रविवारी / सुट्टीच्या दिवशी आयोजित केली जातात.

सदर सत्रांमध्ये संबंधित विषयाची तसेच त्या विषयाच्या अभ्यासक्रमाची ओळख करून दिली जाते. तसेच 'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये 'स्वयं-अध्ययन' हे अत्यंत महत्वाचे असल्याने अभ्यास साहित्य (पुस्तके) वापरून 'स्वयं-अध्ययन' कसे करावे यासंबंधी मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या संबंधित विषयाच्या अडचणी / शंका यांचे निरसन देखील सदर सत्रांमध्ये केले जाते. तरी सदर सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होणे विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे. सदर सत्रे ही ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येतात.

**परीक्षा पद्धती**

एम.कॉम. अभ्यासक्रमासाठी 'वार्षिक' परीक्षा पद्धती आहे. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी ७० गुणांकरिता 'वार्षिक' परीक्षा घेतली जाते. तसेच, अभ्यास केंद्राद्वारे घेण्यात येणाऱ्या अंतर्गत परीक्षेसाठी ३० गुण राखीव असतात. प्रत्येक विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी 'अंतर्गत परीक्षा' आणि 'वार्षिक परीक्षा' या दोन्हीपरीक्षांमध्ये किमान ४० % गुण मिळवून स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. वार्षिक परीक्षा ही मुक्त अध्ययन प्रशाळेच्या अभ्यासकेंद्रावरच होईल.

प्रत्येक विषयामध्ये अंतर्गत आणि वार्षिक अशा दोन्ही परीक्षेत किमान ४० % गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यास त्या विषयाचे श्रेयांक प्राप्त होतील. प्रथम वर्षाच्या ४ विषयांना प्रत्येकी ८ श्रेयांक याप्रमाणे ३२ श्रेयांकापैकी किमान १६ श्रेयांक प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र राहील. प्रथम वर्षास प्रवेश घेतल्यापासून जास्तीत जास्त ४ वर्षांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.

**प्रवेशासंदर्भात काही शंका असल्यास आपण निवडलेल्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधता येईल.**
**अभ्यास केंद्राचा संपर्क तपशील प्रशाळेच्या unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

S.P.P.U. SODL